वाचले :-

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६८ व ६९

२) आदेश क्र. लेखा/१अ/कावि/५७२/२०१८ दि. २३/५/२०१८

३) मा.स्थायी समिति कडील मंजूर ठराव क्र. २८६० दि. २७/६/२०१८ व
ठराव क्र. ३०३० दि. ८/८/२०१८

४) दिनांक १५/०८/२०१८ चा मंजूर प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
लेखा विभाग,
क्र. लेखा/१अ/कावि/ १०३८/९४७७ /२०१८
दिनांक :-१६/०८/२०१८

**विषय :-** वित्तीय अधिकार प्रदान करणे बाबत.(दुरूस्ती)

आदेश

आदेश क्र.लेखा/१अ/कावि/५७२/२०१८ दि.२३/५/२०१८ सर्व विभाग प्रमुख/शाखाप्रमुख यांना वित्तीय अधिकारी प्रदान करण्यात आले आहेत. शहर अभियंता यांनी दि.२/६/२०१८ च्या पत्रान्वये सदर आदेशातील अ.क्र.४(१) व अट क्र.६ मध्ये पी.डब्लु.डी. मॅन्युअल परिशिष्ट २ नुसार कार्यकारी अभियंता देयके अदा करीत असल्याने दुरूस्ती करण्याबाबत विनंती केली आहे. त्यांनी सुचविलेली दुरूस्ती योग्य असल्याने व संदर्भिय आदेशातील काही त्रुटी दूर करण्यासाठी खालील प्रमाणे दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीला मा.स्थायी समिति सभेने ठराव क्र. २८६० दि. २७/६/२०१८ व ठराव क्र. ३०३० दि. ८/८/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

| **अ. क्र** | **आदेशातील अ.क्र.** | **वाचले क्र.१ मधील आदेशातील मजकूर ( २३/५/२०१८)** | **दुरूस्ती करावयाचा मजकूर** |
|---|---|---|---|
| १ | १- अतिरिक्त आयुक्त -१ | प्रशासकीय मंजुरीसाठी प्रस्तावित करून र.रू.१,००,००,०००/-(१कोटी) पर्यंतची कामे. | प्रशासकीय मंजुरीसाठी र.रू.१,००,००,०००/-(१कोटी) पर्यंतच्या कामांचे प्रस्ताव सादर करणे.<br>र.रू.२५ लाख कमाल मर्यादे पर्यंतच्या कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे. |
| २ | २–अतिरिक्त आयुक्त - २ | प्रशासकीय मंजुरीसाठी प्रस्तावित करून र.रू.१,००,००,०००/-(१कोटी) पर्यंतची कामे. | प्रशासकीय मंजुरीसाठी र.रू.१,००,००,०००/-(१कोटी) पर्यंतच्या कामांचे प्रस्ताव सादर करणे.<br>र.रू.२५ लाख कमाल मर्यादे पर्यंतच्या कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे. |
| ३ | ३(१) सह आयुक्त | र.रु.५०,००,०००/- (५० लक्ष) कमाल मर्यादेपर्यंतच्या कामांना/ खर्चाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे संबधी कार्यवाही करणे व संबंधित कामांसाठी निविदा मागवून अटी शर्ती निर्धारित करून स्वाक्षरी करणे, करारनामा करणे, देयके अदा करणे. | प्रशासकीय मंजुरीसाठी र.रू.५०,००,०००/- (५० लक्ष) पर्यंतच्या कामांचे प्रस्ताव सादर करणे.<br>र.रू.२५ लाख कमाल मर्यादे पर्यंतच्या कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे. |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| ४ | ४(१)-शहर अभियंता<br>६(१) – सह शहर अभियंता स्थापत्य,<br>७(१) – सह शहर अभियंता (वि/यां), विद्युत<br>८(१)- सह शहर अभियंता (पा.पु.)<br>९(१) – सह शहर अभियंता जल:निसारण | र.रू.२५,००,०००/- कमाल मर्यादेपर्यंतच्या कामांना/खर्चाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे संबधी कार्यवाही करणे व संबधित कामांसाठी निविदा मागवून अटी शर्ती निर्धारित करून स्वाक्षरी करणे. करारनामा करणे, देयके अदा करणे | र.रू.२५,००,०००/- कमाल मर्यादेपर्यंतच्या कामांना/खर्चाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे संबधी कार्यवाही करणे व संबधित कामांसाठी निविदा मागवून अटी शर्ती निर्धारित करून स्वाक्षरी करणे. करारनामा करणे. |
| ५ | अट क्र.६ | प्रशासकीय व वित्तीय approval झाल्यानंतर सर्व करारनामे विभाग प्रमुखांनी करावेत व कार्यादेश विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरीने निर्गमित करावेत. | प्रशासकीय व वित्तीय approval झाल्यानंतर सर्व करारनामे विभाग प्रमुखांनी करावेत. व कार्यादेश विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरीने निर्गमित करावेत. अभियंत्रिकी विभागांच्या बाबतीत कार्यादेश कार्यकारी अभियंता निर्गमित करतील. |
| ६ | १३ सर्व क्षेत्रिय अधिकारी<br>क्षेत्रिय कार्यालय | १) अभियांत्रिकी स्वरुपाची कामे वगळून र.रु १०,००,०००/- कमाल मर्यादेपर्यंतच्या कामांना/ खर्चाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे व संबंधित कामांसाठी निविदा मागवून अटी व शर्ती निर्धारित करुन स्वाक्षरी करणे, करारनामा करणे, देयके अदा करणे. | र.रु ५ लक्ष ते र.रु १० लक्ष पर्यंतची विकास कामे, देखभाल दुरुस्ती कामे व खरेदीसाठी प्रशासकीय व वित्तीय मंजूरीचे अधिकार- क्षेत्रिय अधिकारी यांना राहतील. |
| ७ | ----- | ----- | र.रु ० ते र.रु ५ लक्ष पर्यंतची विकास कामे, देखभाल दुरुस्ती कामे व खरेदीसाठी प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका<br>अधिनियमातील कलम २९ – अ पोटकलम -७ (क) नुसार प्रभाग समितीला आहेत. |

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८ उपरोक्त वाचले क्र.१ चे आदेशात वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देत आहे .

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८



Scanned by CamScanner